# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

************

**Reaccredited By NAAC with ‘A + +’ Grade**

# Syllabus

# सुगम संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम

## सहामाही कोर्स

## संगीत व नाटयशास्त्र विभाग

आंर्तविद्याशाखा **(Interdiciplinary studies )**

**अभ्यासक्रम 2021 पासून पुढे लागू**

## 1. अभ्यासक्रमाचे शिर्षक – सुगम संगीत प्रमाणपत्र अभ्याक्रम

**2. आंर्तविद्याशाखा** (Interdiciplinary studies )

**3. अंमलबजावणी वर्ष** – 2021 – 2022

**4. प्रस्तावना** – सुगम संगीतमध्ये समाविष्ठ होणारे भावगीत,भक्तीगीत नाटयसंगीत (सुगमगीते) अभंग, गवळण, गझल, इत्यादी अनेक मराठी गीतांचा समावेश होतो. जे.एल.रानडे, गजाननराव वाटवे, सुधीर फडके, श्रीनिवास खळे, हृदयनाथ मंगेशकर, यशवंत देव, यांसारख्या अनेक संगीतदारांनी तसेच लता मंगेशकर, आशा भोसले, अरूण दाते, सुरेश वाडकर अश्या अनेक गाायकांनी सुगमसंगीत प्रकारांना आपल्या आवाजाने व चालींनी सजविले व प्रचलित केले. कवी सुरेश भट ,मंगेश पाडगांवकर, ग्रेस,वसंत बापट, अश्या अनेक कवींची भावगीते, तसेच संत कवीचे अभंग, गौळणी, अशा समृध्द काव्यपरंपरा सुगमसंगीताच्या माध्यमातून लोकांच्या मनामध्ये व उतरली आहे. शिवाजी विदयापीठाच्या संगीत व नाटयशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यात येणा–या या सुगमसंगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा सुगम संगीत शिकु इच्छीणा–या व आवड असणा–या सर्वांना लाभ होईल.

**5. अभ्यासक्रमाचे उद्देश** –

1. सुगम संगीत कलेचे तंत्रशुध्द शिक्षण देणे
2. सुगम संगीत कलेतील बुजुर्ग कलाकारांच्या ज्ञानाचा लाभ करून घेणे व या कलांचे संवर्धन करणे.
3. सुगम संगीत कलेचा प्रसार व प्रचार करणे
4. सुगम संगीत तयार करणे व त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

6. **अभ्यासक्रमाचा कालावधी** – 6 महिने

**7. आकृतीबंध** – सहामाही अभ्यासक्रम (120 तास)

**8. अभ्यासक्रम फी** – 2500/–

9. **पात्रता** – 1) लिहीता वाचता येणे व मराठी बोलता येणे आवश्यक
2) सुगम संगीत कलेची आवड

10. **माध्यम** – मराठी

11. **अभ्यासक्रम संरचना** –

1) सदर अभ्यासक्रम हा 120 तासांचा असेल.
2) या अभ्यासक्रमासाठी केवळ प्रात्याक्षिक असेल.
3) अभ्यासक्रमाच्या शेवटी प्रात्यक्षिक परीक्षा घेवून यशस्वी विदयार्थ्यांना विदयापीठामार्फत प्रमाणपत्र देण्यात येईल.

12. **एकूण तास** – 120 (प्रात्यक्षिक)

13. **इतर वैशिष्ठे** –

1) प्रवेशक्षमता –15 विदयार्थी
2) ढोलकी, हार्मोनियम, डफ, खंजीरी, दिमडी, तुणतुण, झांज, इत्यादी आवश्यक वादये.

14. **मार्गदर्शक तत्वे** –

1) या अभ्यासक्रमासाठी विदयार्थ्यांची हजेरी किमान 75 % असणे आवश्यक
2) अनुभवी शिक्षक / व्यावसायिक कलाकारांचे मार्गदर्शन/साथीदार उपलब्ध करून दिले जातील.
3) सुगम संगीत विषयासंदर्भात प्रात्यक्षिकसह तज्ञ कलाकारांच्या प्रात्याक्षिकासह कार्यशाळा आयोजित केल्या जातील.

**Workload- 120 lectures** **Intake-15**

## सुगम संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम ( कालावधी 120 तास )

**अभ्यासक्रम**

1) सुगम संगीताचा थोडक्यात इतिहास.

2) सुगम संगीत गाण्यासाठी आवश्यक पलटे किंवा अलंकार.

3) शब्दोच्चार व श्वास नियंत्रण.

4) सुगम गायकीतील विविध प्रकार

उदा : भावगीत, भक्तीगीत, नाट्यसंगीतातील सुगम गीते, अभंग, गवळण, गझल इत्यादी.

5) सुगम संगीतातील रचनांची वैशिष्ट्ये.

6) सुगम संगीतासाठी आवश्यक ताल.

7) सुगम संगीतासाठी आवश्यक साथीची वाद्ये व माहीती.

8) सुगम संगीतासाठी आवश्यक रागांची थोडक्यात माहीती.” ” ” ” ” ” ” ” ” ” ”